वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सूचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१९/प्र.क्र.२६/महामंडळे,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०८ मार्च, २०१९

वाचा - १. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शासाउ-१०१०/प्र.क्र.९६/१०/सा.उ., दि.१३.३.२०१२
२. शासन निर्णय क्र. वनाम-२०१७/प्र.क्र.८७/महामंडळे, दि. २८.१.२०१९
३. शासन निर्णय, समक्रमांक, दि.२२.२.२०१९ व दि. २.३.२०१९

प्रस्तावना-

वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सूचविण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २२.२.२०१९ अन्वये समिती गठीत करण्यात आली असुन सदर समितीच्या अध्यक्ष पदावर शासन निर्णय दि.२.३.२०१९ अन्वये श्री. विजय लक्ष्मण चौगुले, रा. ऐरोली, नवी मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय -

श्री. विजय लक्ष्मण चौगुले, अध्यक्ष, वडार समाजाच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सूचविण्यासाठी गठीत करण्यात आलेली समिती यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात येत आहे.

सदर समितीने वडार समाजाच्या आर्थिक उन्नतीकरीता शासनास विशेष योजना प्रस्तावित केल्यानंतर श्री. विजय लक्ष्मण चौगुले यांना देण्यात आलेला राज्यमंत्री दर्जा आपोआप संपुष्टात येईल.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०३०८१७४४३७७४२२ असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Shri Ravindra Gurav
Date: 2019.03.08 17:46:29 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.

३. मा. राज्यमंत्री, (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४. मा. प्रधान सचिव (विजाभज) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५. श्री. विजय लक्ष्मण चौगुले, एल १०५, यश पॅराडाईज, से.८, ऐरोली, नवी मुंबई.
६. उप संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे/नाशिक/औरंगाबाद
८. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ म., मुंबई
९. सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे
१०. निवड नस्ती.